# उमा देवी (टुन टुन)



१९३३ साली उत्तर प्रदेशातील मथुरेजवळील गावात एका कर्मठ पंजाबी खत्री कुटुंबात उमादेवीचा जन्म झाला. अगदी लहान वयातच दुर्देवाने तिचे आईवडील वारले. लहानपणी तिला आकाशवाणीवरील गाणी ऐकण्याचा छंद होता. या छंदाचं हळूहळू चित्रपट संगीताच्या आकर्षणात रुपांतर झालं. तिचे काका तिचा सांभाळ करीत आणि त्यांच्या घरी गाण्यासाठी उत्तेजन मिळणं कठीणच होतं. परंतु रामलीलेमध्ये गाणं म्हटलं तर चालत असे कारण त्यामुळे मुलं बिघडण्याचा संभव नाही असं सर्वांना वाटे.

१९४४ मध्ये नौशाद यांची 'रतन' चित्रपटातील गाणी संपूर्ण हिंदुस्थानात गाजली आणि उमा हरखून गेली. तिला नौशाद यांनी स्वरबध्द केलेली गाणी गाण्याची इच्छा होती. 'अखियॉं मिलाके, जिया भरमाके' (व्वा !), 'मिलके बिछड गयी अखियॉं, हाय रामा' यांसारखी गाणी ऐकून केवळ ११ वर्षाच्या उमादेवीने गायिका होण्याचं ठरवलं. एवढंच नाही तर केवळ संगीतकार नौशाद अली यांच्याकडेच गायचं ठरवलं.

हे मनात ठेवूनच तिने गाण्याची तालीम सुरू ठेवली. दोन वर्षानी ती आगगाडीत बसली आणि चक्क मुंबईला येऊन थडकली. परंतु गाण्याचं अधिकृत शिक्षण, परंपरा, घराणं किंवा ओळखीची चिठ्ठी–चपाटी याखेरीज नौशादना भेटणं शक्य होतं का ? एका बाजूला संगीतातील एक दिग्गज ज्याला अमीरबाई, झाहेराबाई आणि सुरैय्या यांपैकी नक्की कुणाची निवड करावी ते कळत नव्हतं तर दुसऱ्या बाजूला एक स्वप्नाळू मुलगी जिला साधा ध्वनीक्षेपक कसा पकडावा याचंही शिक्षण नव्हतं !

परंतु १९४७ मध्ये 'वमक अझरा' या चित्रपटात तिला संधी मिळाली. या चित्रपटाचं संगीत दिग्दार्शक अल्लारखॉं कुरेशी (पुढे उस्ताद अल्लारखॉं या नावाने ते प्रसिध्द झाले) आणि चित्रपटाचे निर्माता दिग्दर्शक नझिर ह्या दोघांनी 'हाय दो दिल मिलते मिलते रह गये' हे गाणं तिच्यावर ध्वनीमुद्रित करण्यासाठी आपला बहुमूल्य वेळ खर्च केला. आणखी एक जबरदस्त प्रतिस्पर्धी मलिका पुखराज हिने चित्रपटातील इतर गाणी म्हटली होती. त्यामुळे नवोदित उमा अस्वस्थ झाली. त्यात तिला ध्वनीक्षेपकासमोर गाणं कसं म्हणावं याचीही

फारशी माहिती नसल्याने यात भरच पडली. परंतु कसं कोण जाणे पुढे सारं सुरळीत झालं.

आता योग्य ती पात्रता अंगी असल्यामुळे तिने नौशाद यांना भेटायचं ठरवलं. साहसी माणसाला नशिबाची दारं उघडतात असं म्हणतात. तिला या मोठ्या संगीतकाराचीच नव्हे तर चित्रपट निर्माता करदारचीही भेट घेता आली. त्या दोघांनी तिच्या आवाजाची चाचणी घेतली आणि त्यासाठी नूरजहॉंने म्हटलेल्या 'ऑंधियॉं गमकी यूँ चली' या गाण्याची तिने निवड केली. ती चांगली गाऊ शकेल याची या संगीत दिग्दर्शकाची खात्री पटली आणि त्यांनी तिला ५०० रु. आगाऊ देण्याची व्यवस्था केली. १९४७ साली तेवढ्या पैशात कितीतरी गोष्टी खरेदी करता येत असत. शिवाय त्यांनी तिची इतर कर्मचाऱ्यांबरोबर गेस्टहाऊसमध्ये राहण्याचीही व्यवस्था केली. तिने नौशादसाठी गायलेलं पहिलं गाणं म्हणजे 'दर्द' या चित्रपटातील मुनावर सुलताना हिच्यावर चित्रित केलेलं 'अफसाना लिख रही हूँ' हे ढंगदार गाणं ! ते खूपच गाजलं आणि ह्याच गाण्यामुळे ती सगळ्यांच्या लक्षात राहिली. ह्याच चित्रपटात तिने आणखी दोन गाणी म्हटली – ती म्हणजे 'आज मची है धूम, झूम खुषी मे झूम' आणि 'ये कौन चला हाय ये कौन चला'. 'दर्द' हा शकील बदायुनींचा पहिला चित्रपट. त्यांनी नौशाद यांना आयुष्यभर साथ दिली. परंतु उमादेवीने यानंतर नौशाद यांच्या मोजक्याच चित्रपटांत गाणी म्हटली. उदा. 'नाटक' मधील सॅक्सोफोन व इतर पाश्चिमात्य वाद्यांसह म्हटलेलं 'दिलवाले जल जल के मर जाना' हे पाश्चिमात्य सुरावटीचं गाणं, नंतर 'अनोखी अदा' मधील 'काहे जिया डाले हो कहा नही जाये' हे गाणं आणि त्यानंतर फक्त 'चांदनी रात' आणि 'दिल्लगी' मधील काही खास नसलेली गाणी एव्हढीच गाणी तिच्या वाट्याला आली.

दरम्यान तिच्या ह्या गाण्यांना मिळालेल्या यशामुळे तिने रंगमाचावरील बऱ्याच कार्यक्रमांमध्य भाग घ्यायला सरुवात केली. 'अफसाना लिख रही हूँ' हे प्रेक्षकांना प्रचंड आवडायचं. एका अशाच कार्यक्रमाच्या वेळी तिची एका पाकिस्तानी माणसाशी भेट झाली. त्यालाही तिचं हे गाणं फारच आवडत असे. आणखीही काही वेळा त्यांच्या भेटी झाल्या आणि ती दोघं प्रेमात पडली. त्यानंतर त्यांनी लग्नही केलं. तो मग पाकिस्तानात गेलाच नाही. उमादेवी त्याला 'मोहन' या नावाने संबोधत असे.

उमादेवीने इतर संगीतकारांबरोबरही काम केलं. गुलाम मोहम्मदसाठी 'मॉंग' या चित्रपटात लताबरोबर 'ना जाने क्यू घबरा रही हो' हे द्वंद्वगीत म्हटलं. तिने मद्रासच्या एस. एस. वासनसाठीही गाणी म्हटली आणि त्यांना चंद्रलेखा (१९४८) मधील बरीच गाणी तिला दिली. तसंच तिने एस. राजेश्वरराव या संगीत दिग्दर्शकाबरोबरही काम केलं. 'सजना रे, आज रे', 'मै री' आणि त्याच चित्रपटातील 'मै तो मधुबन मे' या गाण्यांसाठी खूप जणांकडून तिने वाहवा मिळवली. तसंच 'द लास्ट मेसेज' (१९४९) या चित्रपटातली काही गाणीही तिने म्हटली होती. परंतु आता तिचे गाण्यातील सुगीचे दिवस संपत आले

होते. आता मंगेशकर भगिनींपुढे तिचा टिकाव लागणं शक्य नव्हतं. उच्च स्वरातील, तसंच रागदारीतील गाणी त्या उत्तम रितीने गाऊ शकत होत्या. तिचं तसं नव्हतं. दरम्यान तिचं वजनही भरपूर वाढलं होतं आणि तिला पाहून लोकांना हसू येत असे. तिने ह्या गोष्टीचाच पुरेपूर फायदा करून घ्यायचं ठरवलं. तिने राखी-बंधू नौशाद यांच्या मदतीने विनोदी कलाकार म्हणून काम करायचं नक्की केलं.

तिला कधीतरी कॅमेऱ्यापुढे दिलीपकुमारबरोबर काम करायचं होतं. तिने नेहमीव मेठी मोठी स्वप्नं पाहिली. इथेही नशीबाने तिला साथ दिली आणि लवकरच 'बाबुल' (१९५०) मध्ये एक लठ्ठ मुलगी दिलीपकुमारच्या प्रेमात पडते आणि तिला त्याच्याशी लग्न करायचं असतं असं काम मिळालं. शोकान्त असलेल्या या चित्रपटात तिच्या विनोदामुळे प्रेक्षकांना बराच विरंगुळा मिळाला.



तिचा हा अवतार तात्काळ लोकांच्या पसंतीस उतरला. 'बाबुल'नंतर तिचं 'टुनटुन' असं नाव पडलं. तिच्या म्हणण्यानुसार प्रेक्षकांनीच तिला हे नाव दिलं होतं. टुनटुनचा अर्थ काय हे कोणालाच माहित नव्हतं. 'तुणतुणे' नावाचं तारांनी बनवलेलं एक भारतीय वाद्य आहे आणि भक्तीपर गाण्यांत त्याचा उपयोग करण्यात येतो, पण टुनटुन ? कदाचित आता त्याचा अर्थ लठ्ठ (विनोदी) अभिनेत्री असाच झाला असेल. 'आरपार', 'बाझ', 'दीदार', 'अंधेर नगरी चौपट राजा', 'गुनाह', 'चोरी चोरी', 'उडन खटोला', 'मिस्टर अँड मिसेस फिफ्टीफाईव्ह', इ. अनेक चित्रपटांत तिने कामं केली आणि सर्वांना आनंद आणि हास्य भरभरून दिलं.

१९९२ मध्ये तिच्या पतीचं निधन झालं. अधूनमधून ती दूरदर्शन आणि काही संगीताच्या कार्यक्रमांत दिसत असे. तिने लोकांच्या आयुष्यात नेहमीच आनंद आणि उत्साह आणण्याचा प्रयत्न केला आणि हे सर्व मिळवलं स्वतःवर विनोद करून ! मोठमोठी स्वप्ने पहावीत आणि ती सत्यात येईपर्यंत संयमाने वाट पहावी असं आपल्याला दाखवणारी अशी ती एक स्त्री होती.

२००३ च्या नोव्हेंबरच्या मधल्या आठवड्यात उमादेवीला ताप आणि आकडीने बेजार केलं. तिला आशा पारेख हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आलं, परंतु २४ नोव्हेंबर, २००३ रोजी तिचं निधन झालं. तिच्या मागे तिचे २ मुलगे व २ मुली आहेत.

- माणेक प्रेमचंद अनुवाद-अन्नपूर्णा (चित्रा) रांगणेकर

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com